# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय माहितीचा अधिकार (फी आणि परिव्यय यांचे विनियमन) नियम, २००६

**क्रमांक आरटीआय.१/मा.अ./०६, दिनांक १० मार्च २००६ - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, (२००५** चा २२) याच्या कलम २८ च्या पोट-कलम (२) (एक), (दोन) आणि तीन द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सभापती, महाराष्ट्र विधान परिषद आणि अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा याद्वारे, पुढील नियम तयार करीत आहेत :-

**१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. -**

(१) **या नियमांना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय माहितीचा अधिकार (फी आणि परिव्यय यांचे विनियमन) नियम, २००६** असे म्हणावे.

**(२)** ते राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

**२. व्याख्या.** - या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

**(अ) अधिनियम** याचा अर्थ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ असा आहे,

**(ब) कलम** याचा अर्थ अधिनियमाचे कलम असा आहे, आणि

**(क)** या नियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले अन्य सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ राहतील.

**३.** कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंती अर्ज साध्या कागदावर जोडपत्र (अ) मध्ये दिलेल्या नमुन्यात करण्यात

येईल, आणि त्यासोबत **Committee Officer, Maharashtra Legislature Secretariat** यांना देय असलेली रूपये दहा इतकी अर्ज फी रोख रकमेच्या स्वरूपात तिची योग्य पावती घेऊन किंवा मनीऑर्डरद्वारे किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

**४.** कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती पुरविण्याकरिता, Committee Officer, Maharashtra Legislature Secretariat यांना देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात तिची योग्य पावती देऊन किंवा मनीऑर्डरद्वारे किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात पुढील दराने आकारण्यात येईल :-

(अ) तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) ३ रूपये,

(ब) मोठया आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंमत,

(क) नमुने किंवा प्रतिमानांकरिता (मॉडेल) प्रत्यक्ष परिव्यय किंवा किंमत, आणि

(ड) अभिलेख पाहण्यासाठी पहिल्या तासाकरिता दहा रूपये आणि त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरिता (किंवा त्याच्या भागाला) पाच रूपये इतकी फी.

**५.** कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये कोणतीही माहिती पुरविण्यासाठी Committee Officer, Maharashtra Legislature Secretariat यांना देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती देऊन किंवा मनीऑर्डरच्या स्वरूपात किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात पुढील दराने आकारण्यात येईल :-

(अ)  डिस्केट्स किंवा फ्लॉपी या स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केट्स किंवा फ्लॉपीकरिता पन्नास रूपये, डिस्केट्स किंवा फ्लॉपी अर्जदाराने स्वत: आणणे आवश्यक आहे.

(ब) छापील स्वरूपात माहिती पुरविण्याकरिता अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंवा अशा प्रकाशनातील उताऱ्यांच्या प्रत्येक छायांकित पृष्ठांसाठी तीन रूपये.

**६.** अर्जदार व्यक्तिश: येऊन माहिती घेऊन जाईल त्याबाबतीत कोणताही टपालखर्च आकारण्यात येणार नाही. परंतु डिस्केट्स/फ्लॉपी या स्वरूपातील माहिती टपालाने मागविली असल्यास योग्य तो टपालखर्च आकारण्यात येईल.

**७. अपील.** - कलम ७ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत निर्णय मिळाला नसेल अशा किंवा माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या, कोणत्याही व्यक्तीस, माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याचा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र **ब** मध्ये दिलेल्या नमुन्यात अपील दाखल करता येईल. अशा अपिलासोबत, ज्याविरूध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह Committee **Officer, Maharashtra Legislature Secretariat** यांना देय असलेली रूपये वीस इतकी अपील फी, रोख रकमेच्या स्वरूपात तिची योग्यपावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रूपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

जोडपत्र **"अ"**

**[ नियम ३ पहा ]**

*( येथे रू. १० चा न्यायालय* **फी** *मुद्रांक चिकटवावा .)*

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना

प्रति,

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ---------------------------------------------------
(२) पत्ता : -------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------

(३) हव्या असलेल्या माहितीचा तपशील :
(एक) माहितीचा विषय * :
(दोन) माहिती कोणत्या सभागृहाशी संबंधित आहे,
विधानसभा / विधानपरिषद :
(तीन) ज्या कालावधीसंबंधात माहिती हवी
असेल तो कालावधी ** :
(चार) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन *** :
(पाच) माहिती टपालाद्वारे हवी आहे की
व्यक्तिश: हवी आहे

(प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फीमध्ये समाविष्ट करण्यात येईल)

:

(सहा) टपालाद्वारे हवी असल्यास, :
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे ? :
(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित
[झेरॉक्स] प्रत जोडावी).

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही